ePaper
धनुष्यबाण कोणाचा, शिंदे की ठाकरे? 16 जुलैला ‘सुप्रीम’ सुनावणी
वर्ष - 8 । अंक - 324 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज™

आतील पानांत
- रवी शास्त्री जसप्रीत बुमराहवर संतापले
- शुबमन गिलचं लागोपाठ दुसरं शतक!
- राहुल गांधी विरोधात ईडीचा आरोप
- त्यांना हाकलून लावले पाहिजे

www.mahaenews.com | गुरुवार, दि. 3 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ‘दहशतवादी’ पाकिस्तान आता संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचा अध्यक्ष..193 पैकी 182 देशांनी दिला पाठिंबा

# पाकड्यांच्या हातात कोलीत !

## संयुक्त राष्ट्रांचा भारताला जबरदस्त झटका : परराष्ट्रनीती पूर्णपणे अपयशी : काँग्रेसचा आरोप !




। न्यूयॉर्क / नवी दिल्ली / मुंबई ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**पाकिस्तानला ‘दहशतवादी राष्ट्र’ म्हणून घोषित करा, ही भारताने संयुक्त राष्ट्रांकडे लावून धरलेली मागणी हवेत विरली. या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावत संयुक्त राष्ट्रांनी भारताला जबरदस्त झटका दिला आहे आणि पाकड्यांच्या हातामध्ये कोलीत देऊन त्यांना मोठे बळ दिले आहे.**

### अनाकलनीय निर्णय...

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनच्या जीवावर माजलेल्या पाकड्यांमुळे भारताची डोकेदुखी आता चांगलीच वाढली आहे. संयुक्त राष्ट्रांनी अनाकलनीय निर्णय घेऊन पाकिस्तानच्या बाजूने कौल दिला आहे तर भारताला जीवघेणा दणका दिला आहे.

### पाकला केवढा पाठिंबा !

भारताच्या डोकेदुखीमध्ये वाढ करणाऱ्या घटनेचे निमित्त म्हणजे संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेचे अध्यक्षपद हेच आहे. संयुक्त राष्ट्रांची अत्यंत महत्त्वाची बाब असलेल्या सुरक्षा परिषदेच्या अध्यक्षपदी पाकची निवड झाली आहे. पाकच्या पाठीशी १९३ पैकी १८२ देश ठाम उभे राहिले आहेत, ही सर्वात दुर्दैवी बाब म्हणावी लागेल. प्रचंड पाठिंबा मिळवून पाकिस्तान या पदावर विराजमान झाला आहे. दहशतवादाला पोसणारा पाकच संयुक्त राष्ट्रामध्ये महत्त्वाच्या स्थानावर गेल्यामुळे भारताची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे.

### दि. एक जुलै पासून बदल..

पाकने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या अध्यक्षपदाची सूत्रे मंगळवारी म्हणजे दि. १ जुलै रोजी हाती घेतली आहेत. याआधी जानेवारी २०२४ मध्ये पाकिस्तानची दोन वर्षांसाठी या परिषदेचा अस्थायी सदस्य म्हणून निवड झाली होती आणि आता १९३ सदस्यांपैकी १८२ सदस्यांचा भक्कम पाठिंबा मिळवत पाक सुरक्षा परिषदेच्या अध्यक्षपदी विराजमान झाला आहे. भारतासाठी थोडीशी समाधानाची बाब म्हणजे पाकिस्तानची ही निवड जुलै महिन्यासाठी असणार आहे, असे काही देशांनी म्हटले आहे.

### मुनीर अक्रम यांचे नेतृत्व

पाकचे राजदूत मुनीर अक्रम यांच्या नेतृत्वाखाली आता सुरक्षा परिषदेमध्ये जुलै महिन्यातील महत्त्वाच्या चर्चांची दिशा ठरवली जाणार आहे. पाकिस्तानने ही नवी जबाबदारी ‘भू-राजकीय पारदर्शकता, समावेशकता’ या तत्त्वांवर आधारलेली असल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

### जुलै महिन्याचा कार्यक्रम...

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या महत्त्वाच्या बैठकींचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. दि. २२ जुलै रोजी ‘बहुपक्षीयतेद्वारे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा’ या विषयावर खुली चर्चा होणार आहे. दि. २४ जुलै रोजी ‘संयुक्त राष्ट्रे आणि इस्लामिक सहकार्य संघटना यामधील सहकार्य’ या विषयावर विशेष अधिवेशन बोलावण्यात आले आहे. महत्त्वाचे म्हणजे,या दोन्ही बैठकींचे अध्यक्षस्थान पाकचे परराष्ट्र मंत्री आणि उपपंतप्रधान इशाक दार भूषवणार आहेत.

### दहशतवादाचा मुद्दा

भारताने संयुक्त राष्ट्रांसमोर नेहमीच ‘दहशतवादा’ चा मुद्दा उपस्थित केला असून याच मुद्द्यावर भारताने आक्षेप नोंदविला आहे. एकीकडे हे पद मिळवण्यासाठी पाकने मोठा आंतरराष्ट्रीय पाठिंबा मिळवला, तर दुसरीकडे भारताने पाकच्या दुटप्पी भूमिकेवर जोरदार टीका केली.

### दहशतवाद पोसणारा देश

‘दहशतवादाला पोसणारा देश’ असे म्हणत भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी पाकवर सतत टीका केली. जेव्हा एखादा देश आपल्या शेजारील देशाविरुद्ध दहशतवादाला पाठीशी घालतो, तेव्हा तो केवळ एकाच देशासाठी नव्हे, तर संपूर्ण जागतिक सुरक्षेसाठी धोका असतो, अशा शब्दात एस. जयशंकर यांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे.

### भारतासाठी अडचण...

भारताने अलीकडेच पाकमधील दहशतवादी अड्ड्यांवर कारवाई केली. ‘ऑपरेशन सिंदूर’ मध्ये त्यांचे नऊ दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले आणि सुमारे दीडशे दहशतवादी ठार केले. तसेच सिंधू पाणी करार निलंबित करण्याचा निर्णय घेतला. या पार्श्वभूमीवर पाकची संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या अध्यक्षपदी निवड होणे, हे भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी अडथळ्याचे ठरू शकते, तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक निर्णय घेण्यासाठी पण अंगलट येऊ शकते.

### भारताच्या परराष्ट्रनीतीचे सपशेल अपयश?

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे अध्यक्षपद पाकिस्तानकडे जाणे, हे भारताच्या परराष्ट्रनीतीचे सपशेल अपयश असल्याचा आरोप काँग्रेस पक्षाने केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी परदेश दौऱ्यावर असतात, त्याचप्रमाणे भारताच्या प्रतिनिधींची अनेक शिष्टमंडळे परदेशात जाऊन आली, तरी अनेक राष्ट्रांचे मत भारताच्या बाजूने वळवण्यात अपयश आले असून हे परराष्ट्रनीतीचे अपयश आहे, असे काँग्रेसने म्हटले आहे. १९३ पैकी १८२ देशांनी भारताच्या विरोधात मतदान केले याचा गांभीर्याने विचार करायला हवा आणि योग्य पावले उचलायला हवीत, असा सल्ला काँग्रेसने दिला आहे..

### सुरक्षा परिषद कशी असते ?

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे १५ देश सदस्य असतात. त्यातील पाच स्थायी सदस्य आहेत. त्यामध्ये अमेरिका, रशिया, चीन, फ्रान्स आणि इंग्लंड चा समावेश आहे.

# कत्तलखाना बंद करण्याचे आदेश

## कत्तलखान्यामध्ये दररोज 150 जनावरांची कत्तल : मुख्यमंत्री

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोंढवा येथील कत्तलखान्यातील सांडपाण्याचे नमुने संमतीपत्रामध्ये घालून दिलेल्या मानकांपेक्षा जास्त असल्याने हा कत्तलखाना बंद करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात दिली.कोंढवा येथील कत्तलखान्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या नियमांचे पालन होत नसल्यामुळे कत्तलखाना बंद करण्यासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुणे महापालिकेला नोटीस बजाविली आहे.**



तसेच कत्तलखान्यामध्ये दररोज १५० जनावरांची कत्तल होत असल्याने दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत असून, कत्तलखान्यातील पाणी थेट पिण्याच्या पाण्याच्या वाहिन्यांमध्ये येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे का, अशी विचारणा भाजपचे विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांनी तारांकित प्रश्नाद्वारे केली होती. त्याला उत्तर देताना फडणवीस यांनी कत्तलखाना बंद करण्यात आल्याचे जाहीर केले.‘कोंढवा कत्तलखाना परिसरातील घरगुती वसाहतींच्या पाणी प्रदूषण आणि दुर्गंधीसंदर्भातील तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून २८ फेब्रुवारी २०२५ मध्ये कत्तलखान्याची पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान सांडपाण्याचे नमुने कत्तलखान्याला संमतीपत्रामध्ये घालून दिलेल्या मानकांच्या प्रमाणापेक्षा अधिक असल्याचे आढळून आले. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत त्या संदर्भात कत्तलखान्याला आदेश देण्यात आले होते. त्यानंतर वैयक्तिक सुनावणी घेऊन ८ मे रोजी कत्तलखाना बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत,’ असे फडणवीस यांनी सांगितले.तसेच कत्तलखान्यामध्ये दररोज १५० जनावरांची कत्तल होत असल्याने दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत असून, कत्तलखान्यातील पाणी थेट पिण्याच्या पाण्याच्या वाहिन्यांमध्ये येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे का, अशी विचारणा भाजपचे विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांनी तारांकित प्रश्नाद्वारे केली होती. त्याला उत्तर देताना फडणवीस यांनी कत्तलखाना बंद करण्यात आल्याचे जाहीर केले.‘कोंढवा कत्तलखाना परिसरातील घरगुती वसाहतींच्या पाणी प्रदूषण आणि दुर्गंधीसंदर्भातील तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून २८ फेब्रुवारी २०२५ मध्ये कत्तलखान्याची पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान सांडपाण्याचे नमुने कत्तलखान्याला संमतीपत्रामध्ये घालून दिलेल्या मानकांच्या प्रमाणापेक्षा अधिक असल्याचे आढळून आले.

### पुणे महापालिकेला नोटीस बजाविली

त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत त्या संदर्भात कत्तलखान्याला आदेश देण्यात आले होते. त्यानंतर वैयक्तिक सुनावणी घेऊन ८ मे रोजी कत्तलखाना बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत,’ असे फडणवीस यांनी सांगितले.कोंढवा येथील कत्तलखान्यातील सांडपाण्याचे नमुने संमतीपत्रामध्ये घालून दिलेल्या मानकांपेक्षा जास्त असल्याने हा कत्तलखाना बंद करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात दिली.कोंढवा येथील कत्तलखान्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या नियमांचे पालन होत नसल्यामुळे कत्तलखाना बंद करण्यासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुणे महापालिकेला नोटीस बजाविली आहे.

# नाट्यगृहांच्या स्वच्छतेची ‘नांदी’!

## स्वच्छतेसाठी 1 कोटी 22 लाख रुपयांच्या निविदा काढण्यात आल्या

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील महापालिकेची सात नाट्यगृहे तसेच सांस्कृतिक केंद्रांची साफसफाई आणि स्वच्छतेसाठी १ कोटी २२ लाख रुपयांच्या निविदा काढण्यात आल्या आहेत. त्यामध्ये बालगंधर्व रंगमंदिरासह यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, पंडित भीमसेन जोशी कलादालन यांचा समावेश आहे. संबंधित ठेकेदाराला हे काम करण्याची परवानगी देण्याबरोबर त्यांच्याशी करारासाठी मान्यता द्यावी, असा प्रस्ताव स्थायी समितीसोर ठेवण्यात आला आहे.**



बालगंधर्व रंगमंदिरात नाटकाचा प्रयोग सुरू असताना अचानक उंदीर आणि मांजराचा खेळ नाट्यरसिकांना पाहायला मिळाला होता. कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहातदेखील नाटकाचा प्रयोग सुरू असताना एका महिलेच्या पायाजवळून उंदीर गेला होता. नाट्यगृहामध्ये खाद्यपदार्थ नेण्यासाठी मनाई असतानाही खाद्यपदार्थ नेले जात असल्याचे यानिमित्ताने उघड झाले होते. तसेच, नाट्यगृहे आणि कलादालनांमध्ये आवश्यक स्वच्छता होत नसल्याने उंदीर, घुशी, डास असल्याच्या तक्रारी केल्या जात होत्या. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवला आहे. या प्रकारानंतर महापालिकेने शहरातील नाट्यगृहे, सांस्कृतिक केंद्रे, कलादालने यांची स्वच्छता करण्यासाठी निविदा मागविल्या. यामध्ये बालगंधर्व रंगमंदिर, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, औंध येथील भीमसेन जोशी कलामंदिर, विजय तेंडुलकर नाट्यगृह – सहकारनगर, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कलादालन, भीमसेन जोशी कलादालन – सहकारनगर यांचा समावेश आहे.एका वर्षासाठी या निविदा काढण्यात आल्या असून, स्वच्छतेसाठी संबंधित ठेकेदार तेथे कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणार आहे. त्यासाठी एक कोटी २० लाख रुपये खर्च केला जाणार आहे. तसेच, या ठिकाणी ४२ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार आहे, असा प्रस्ताव अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी ठेवला आहे. दरम्यान, सांस्कृतिक शहर अशी पुणे शहराची ओळख आहे. महापालिकेने विविध भागांमध्ये नाट्यगृहे, सांस्कृतिक भवन, कलादालन उभारली आहेत. मात्र, अनेक नाट्यगृहांमध्ये अपुऱ्या सोयीसुविधा असल्याने त्याची दुरवस्था झाली आहे. महापालिका दर वर्षी नाट्यगृहांच्या डागडुजीवर कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करते.नाटकाचा प्रयोग सुरू असताना अचानक उंदीर आणि मांजराचा खेळ नाट्यरसिकांना पाहायला मिळाला होता. कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहातदेखील नाटकाचा प्रयोग सुरू असताना एका महिलेच्या पायाजवळून उंदीर गेला होता.

### खाद्यपदार्थ नेण्यासाठी मनाई

नाट्यगृहामध्ये खाद्यपदार्थ नेण्यासाठी मनाई असतानाही खाद्यपदार्थ नेले जात असल्याचे यानिमित्ताने उघड झाले होते. तसेच, नाट्यगृहे आणि कलादालनांमध्ये आवश्यक स्वच्छता होत नसल्याने उंदीर, घुशी, डास असल्याच्या तक्रारी केल्या जात होत्या. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवला आहे

## आरटीओचे दुर्लक्ष, खासगी बसचे भाडे दामदुपट्ट

# पिंपरी चिंचवडमधील प्रवाशांची ‘सरकारमान्य’ लूट

## बसच्या मनमानी भाड्यामुळे प्रवाशांच्या खिशाला चाट

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सुट्ट्यांचा हंगाम सुरु झाला की, नागरिकांना मूळ गावी जाण्याचे किंवा नातेवाईकांना भेटण्यासाठी अथवा पर्यटनाला जाण्याचे वेध लागतात. ह्या काळात रेल्वेला असलेली गर्दी, प्रतीक्षा यादी बघता सामान्य नागरिक हा खासगी प्रवासी बसद्वारे प्रवासाला प्राधान्य देतो. मात्र ,नेमकी प्रवाश्यांची ही गरज ओळखून खासगी बस मालकांनी प्रचंड भाडेवाढ केली आहे. यातून ग्राहकांची पिळवणूक आणि लूटमार सुरू आहे.**



दरम्यान, जास्त भाडे आकारणी करणाऱ्या बसचालक, मालक आणि कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्यात आरटीओ आखडता हात घेत असल्याने प्रवाशांची चक्क ‘सरकारमान्य’ लूट सुरू आहे.पिंपरी-चिंचवड ही कामगार, कष्टकऱ्यांची नगरी म्हणून ओळखली जाते. राज्याच्या तसेच परराज्यातील कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने चाकरमानी उद्योगनगरीत वास्तव्यास आहेत. दिवाळी तसेच उन्हाळ्यात मुलांना शाळेला सुटी लागत असल्याने अनेक जण कुटूंबासह गावी जाण्यास प्राधान्य देतात. शहरातून मूळगावी जाणाऱ्या प्रवाशांमध्ये विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रवाशांची संख्या अधिक आहे. मुख्यत्वे दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीच्या काळात ही संख्या खूप मोठी असते. उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर रेल्वेचे बुकिंग फुल्ल झालेले आहे. एसटी महामंडळाकडेही प्रवाशांची गर्दी असते. त्यामुळे प्रवाशांना खासगी ट्रॅव्हल्स हाच पर्याय शिल्लक असतो.

मात्र, याच संधीचा खासगी प्रवासी वाहतुक करणारे गैरफायदा उठवतात. शहरातून दररोज सुमारे पाचशेहून अधिक खासगी बस राज्याच्या विविध भागात जातात. या व्यतिरिक्त मुंबईहूनही मोठ्या संख्येने खासगी बस पुण्यातून पुढे मार्गस्थ होतात. ट्रॅव्हल्स चालकांकडून या काळात मोठ्या प्रमाणात तिकीट दर वाढवले जातात. काही ठिकाणी तिकीट दरामध्ये दुप्पट, तिप्पट वाढ केली जाते. ही वाढ प्रवाशांच्या खिशाला चांगलाच चाट लावत आहे. प्रवाशांची संख्या वाढण्याच्या काळात बसचे भाडे वाढविण्याचे प्रकार होतात. त्यामुळे प्रवाशांना मोठा भुर्दंड बसत आहे. त्यामुळे सुटीच्या काळात गावी जावे की नाही असा प्रश्न सर्वसामान्यांना भेडसावत आहे. उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत खासगी प्रवासी बसची वाहतूक पथकामार्फत तपासणी करावी. तिकिट बुकिंग काउंटरवरदेखील जाऊन तपासणी व्हावी. गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जावी. भाडेवाढीमुळे प्रवाशांना विनाकारण भुर्दंड सहन करावा लागत आहे. या त्रासापासून सुटका होऊन नागरिकांची होणारी लूटमार थांबवावी, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

### सरकारच्या कमाल दराकडे दुर्लक्ष

खासगी प्रवासी बसला एसटी बसच्या प्रतिकिलोमीटर भाडेदाच्या दीडपट भाडे आकारता येते. याबाबतचे कमाल भाडे सरकारने निश्चित केले आहे. हे दीडपट दर केवळ उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत असतात. काही खासगी प्रवासी बस सणासुदीच्या व गर्दीच्या हंगामामध्ये प्रवाशांकडून मनमानी भाडे आकारतात. मात्र, जास्त भाडे आकारणाऱ्या खासगी बसवर आरटीओ आणि वाहतूक पोलिसांकडून कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे खासगी आराम बस चालकांच्या मनमानीत वाढ होत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बसमालकांवर आरटीओने कारवाई करणे गरजेचे आहे.

---

# बचत गटांच्या महिलांकडून मालमत्ता कर बिलांचे वाटप!

## मालमत्ताधारकांनी सहकार्य करावे : पिंपरी-चिंचवड पालिका प्रशासनाचे आवाहन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षातही महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. तरी बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.**




पिंपरी-चिंचवड शहरात ६ लाख १५ हजार ८६३ नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यानुसार सर्वच बिलांची छपाई होऊन बिले वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. महिला बचत गटातील महिलांच्या माध्यमातून मिळकतकर बिले घरोघरी पोहोचवण्याची जबाबदारी महानगरपालिकेने महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपवली आहे. बिल वाटप करण्यात येणाऱ्या महिलांना महानगरपालिकेच्या वतीने ओळखपत्र ही देण्यात आले आहे. ३१ मे पर्यंत सर्व बिलांचे वितरण करण्याचे नियोजन महानगरपालिकेने केले आहे. तरी नागरिकांनीही बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. मालमत्ता कर भरण्याची ऑनलाइन सुविधा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आर्थिक वर्ष २०२५-२६ ची मालमत्ता कर बिले ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली असून, करदात्यांना त्यांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांची बिले www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता व भरता येतील. तसेच मालमत्ता कर बिले ३० जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने बिले भरल्यास सामान्य करावर १० टक्के सवलत मिळणार आहे.

> बचत गटांच्या महिलांमार्फत मालमत्ता कर बिलांचे वाटप सुरू झाले आहे. यामुळे बचत गटांच्या महिलांच्या आर्थिक सक्षमतेस बळकटी मिळणार आहे. तसेच नागरिकांपर्यंत वेळेवर बिले पोहोचवण्याच्या उद्देशालाही चालना मिळणार आहे. नागरिकांनी देखील बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे.
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> पिंपरी चिंचवड महानगरपालिका मालमत्ता कर विभागाचे बिल वाटप महिला बचत गटांच्या महिलांमार्फत करण्यात येत आहे. ३० जून २०२५ पर्यंत कर भरल्यास मालमत्ताधारकांना विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा.
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### गुरुसेवा करणे म्हणजे काय ?

साधनाची आटाआटी कुठपर्यंत करायची ? जप, तप, नेम, याग वगैरे आपण कशाकरिता करतो ? तर देवाची प्राप्ती व्हावी म्हणून; तोच देव जर आपल्या घरी आला, तर साधनाची आटाआटी कशाला करायची ? म्हणून, साधनाची आटाआटी करण्याचे कारण नाही; नाहीतर त्याचाच अभिमान होतो, आणि मिळवायचे ते बाजूलाच राहून उलट तोटा होतो. जे जे घडत असते ते माझ्या इच्छेने झाले असे समजत जा आणि त्यात आनंद माना. तुम्ही जी जी गोष्ट कराल त्यात मला आठवा. गुरुभक्ती करायची म्हणजे काय ? त्याच्या देहाची सेवा करणे हीच गुरूची सेवा असे तुम्हाला वाटते का ? त्याच्या देहाची सेवा करणे ही गुरूची खरी सेवाच होत नसते; गुरू सांगेल तसे वागणे, हीच त्याची खरी सेवा होय. माझ्याजवळ जे येतात, ते कुणी मुलगा मागतो, कुणी संपत्ती मागतो, कुणी रोग बरा करा म्हणून मागतो; तेव्हा, माझी सेवा करायला तुम्ही येता, का मीच तुमची सेवा करावी म्हणून येता ? माझ्याजवळ येऊन, मनुष्यदेहाचे खरे सार्थक होईल असे करा. तुम्ही मागाल त्याप्रमाणे मी थोडेसे देणार नाही असे नाही; पण ते काढा घेण्याकरिता गुळाचा खडा देण्यासारखे आहे.

'मला सर्व कळते' असे माझ्याबद्दल तुम्ही म्हणता, पण ते मनापासून नव्हेच; कारण ज्याला असे खरोखर वाटत असेल त्याच्या हातून पापकर्म होणारच नाही. ज्याची वृत्ती माझ्याशी एकरूप होईल त्यालाच कळेल की, मला सर्व कळते आहे. गुरूला अनन्य शरण जाणे म्हणजे इतके की, त्याचे मन आणि आपले मन एक झाले पाहिजे; म्हणजे, दैववशात् जरी आपण गुरूपासून दूर असलो तरी मनाने त्याच्याशी संलग्न असल्यावर त्याच्यापाशीच असू. आपण आपल्या आईशी जसे बोलतो तसे माझ्यापाशी बोलावे, आपले सर्व दुःख मला सांगत जावे. तुम्ही इतके कष्ट घेऊन मला भेटायला येता, पण तुम्हांला रिकामे परत जाताना पाहून मला फार वाईट वाटते. माझ्याजवळ जे आहे ते व्यावहारिक जगात कुठेही तुम्हांला मिळायचे नाही; ते म्हणजे भगवंताच्या नामाचे प्रेम होय. सगळ्या प्रपंचात खरी विश्रांती असेल तर ती नामस्मरणातच आहे. ज्याला मी भेटावा असे वाटते, जो माझा म्हणवितो, त्याला नामाचे प्रेम असलेच पाहिजे.

**बोधवचन:- नामावर प्रेम करणे म्हणजेच माझ्यावर प्रेम करणे.**



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# कर्नाटकातील गृहकलहात, भाजपा पोळी भाजणार?

**कर्नाटकात काँग्रेसचे सरकार असून मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री तसेच प्रदेशाध्यक्ष डी.के. शिवकुमार यांच्यामध्ये आता खुर्चीसाठी गृहकलह सुरू आहे. शिवकुमार हे गप्प असले तरी सिद्धरामय्यांना केव्हाही ते उचलून टाकू शकतात. आता, या गृहकलहामध्ये विरोधी भारतीय जनता पार्टी पोळी भाजून घेणार का ? हा खरा चर्चेचा विषय आहे.**




### शिवकुमार यांच्यावर अवलंबून..

शिवकुमार हे काँग्रेस मधील क्रमांक दोनचे नेते आणि उपमुख्यमंत्री असले तरी कर्नाटकात जेव्हा काँग्रेसची सत्ता आली, तेव्हा ते मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत होते. शिवकुमार हे कर्नाटकात अतिशय लोकप्रिय असून सभागृहात काँग्रेसच्या १३८ आमदारांपैकी शंभर आमदारांचा त्यांना पाठिंबा आहे, असे काँग्रेसचे नेते सांगतात. हा गट अलगद बाजूला काढला, तर भाजपाच्या समर्थनावर ते सत्तापालट करू शकतात, हे लक्षात घ्यायला हवे !

### निवडणूक हरण्याचा पराक्रम..

कॉंगेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या अध्यक्षतेखाली कर्नाटकातील विधान सभा निवडणूक जिंकली. ती घटना खर्गे यांच्या दृष्टीने तसेच काँग्रेसच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची होती. त्यापूर्वी, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली सलग निवडणूक हरण्याचा पराक्रम काँग्रेसने केला होता. मात्र, आता कर्नाटक काँग्रेसमधील अंतर्गत कलह आता चव्हाट्यावर आला आहे. सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार यांच्यात सुरू असलेला राजकीय संघर्ष आता राज्यात नेतृत्वबदलाच्या चर्चांपर्यंत पोहोचला आहे.

### काँग्रेसची बिकट वाट वहिवाट !

गेल्या काही दिवसांपासून बिकट परिस्थिती हाताळण्यासाठी काँग्रेस हायकमांड सक्रीय झाली असून पक्षाचे सरचिटणीस रणदीप सुरजेवाला यांना आमदार आणि नेत्यांची भेट घेण्यासाठी बेंगळुरूला पाठवण्यात आले आहे. हा दौरा केवळ संघटनात्मक सिंहावलोकनाचा भाग म्हणून नव्हे, तर संभाव्य नेतृत्व बदल किंवा मंत्रिमंडळ फेरबदलाचा एक भाग मानला जात आहे. सुरजेवाला यांच्यावर पक्ष फुटू न देण्याची मोठी जबाबदारी आहे. वेळप्रसंगी काँग्रेसची सत्ता कायम ठेवून तेच डी. के. शिवकुमार यांचे नाव मुख्यमंत्रीपदासाठी केंद्राला सुचवू शकतात

### अडीच वर्षांचे मुख्यमंत्रीपद!

कर्नाटकातील निवडणुकीनंतर २०२३ मध्ये काँग्रेस सरकार स्थापन होताना दोन्ही नेते अडीच वर्षांसाठी मुख्यमंत्रिपद वाटून घेतील यावर एकमत झाले होते, असा शिवकुमार गटाचा दावा आहे. ऑक्टोबर २०२५ पर्यंत सिद्धरामय्या मुख्यमंत्री राहतील आणि त्यानंतर शिवकुमार यांची पाळी येईल. मात्र, सिद्धरामय्या गटाने अशा कोणत्याही कराराचा स्पष्ट इन्कार केला असून तो काल्पनिक असल्याचे म्हटले आहे. सिद्धरामय्या हे काँग्रेसमधील एकमेव प्रभावी ओबीसी नेते असून अशा नेत्याला मध्यंतरी मुख्यमंत्रिपदावरून हटविणे, पक्षासाठी सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या नुकसानकारक ठरेल, असे काँग्रेस पक्षश्रेष्ठींचे मत आहे. त्यातच,सध्या काँग्रेस अंतर्गत असंतोष वाढत आहे. निधी वाटपाबाबत काही आमदारांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. या नाराजीचे वेळीच निराकरण न झाल्यास त्याचा फटका संघटना आणि सरकार या दोघांनाही बसू शकतो.

### शेवटचा निर्णय पक्षश्रेष्ठींकडे..

पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी थेट कोणत्याही बदलांची घोषणा केली नसली, तरी त्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे अनेक प्रकारच्या अटकळांना उधाण आले. हा निर्णय पक्षश्रेष्ठींच्या हातात आहे. त्यांच्या च्या मनात काय चालले आहे, हे कोणालाच ठाऊक नाही. त्यामुळे हाती सापडेल त्या माहितीनुसार प्रत्येक जण तर्क करत सुटला आहे. खर्गे यांच्या वक्तव्याकडे दोन्ही गट आपापल्या परीने पाहत आहेत. शिवकुमार यांचे समर्थक याकडे संधी म्हणून पाहतात, तर सिद्धरामय्या गटाला त्यात कोणताही ठोस बदल होताना दिसत नाही. कर्नाटक काँग्रेस सध्या दोन वेगवेगळ्या गटात विभागली गेली आहे, हे मात्र निश्चित !

### जातीय विरुद्ध आर्थिक समीकरण

पहिला गट, जो सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्रिपदावर ठेवण्याच्या बाजूने आहे आणि दुसरा जो शिवकुमार यांना संधी देण्याची मागणी करत आहे. दोन्ही नेत्यांची आपापली ताकद आहे. एकीकडे सामाजिक समीकरणांवर सिद्धरामय्या यांची पकड आहे, तर दुसरीकडे पक्ष संघटना आणि निधीवर शिवकुमार यांचे वर्चस्व आहे. या लढ्याचा सर्वात मोठा परिणाम पक्षाला २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सहन करावा लागला. आताही अंतर्गत परिस्थितीवरून संघर्ष संपलेला नसल्याचे स्पष्ट होत आहे.

### तडजोड का उघडपणे बंड..

दोन्ही गटांमधील रस्सीखेच येत्या काळात तडजोड किंवा उघड बंडाला कारणीभूत ठरू शकते. सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांच्यातील संघर्ष काँग्रेससाठी कठीण परीक्षा बनला आहे. पक्षाने ते नीट हाताळले नाही तर कर्नाटक सरकारचे स्थैर्य धोक्यात येऊ शकते आणि राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसच्या ऐक्याच्या प्रतिमेवरही परिणाम होऊ शकतो. हे राजकीय युद्ध कसे संपते, हे आगामी काळात काँग्रेस नेतृत्वाचे कौशल्य आणि दोन्ही नेत्यांच्या प्रगल्भतेवर अवलंबून असेल. काँग्रेसमुक्त भारत करण्याची भाजपाची घोषणा नेहमीचीच आहे. त्यात कर्नाटक सारखे मोठे राज्य काँग्रेसच्या ताब्यात असल्यामुळे तेथील प्रत्येक घडामोडीवर भाजपाचे बारीक लक्ष असणार. त्यात शिवकुमार हे नाराज असल्यामुळे त्यांच्याभोवती एव्हाना मोठे जाळे टाकलेले असणार ! त्यांचा गट अलगद बाजूला काढून भाजपाच्या पाठिंब्यावर त्यांना मुख्यमंत्रीपद मिळू शकते, याची कल्पना एव्हाना त्यांना दिली असणार ! आणि मुख्य म्हणजे 'ऑपरेशन लोटस' काय असते हे कर्नाटकला चांगलेच माहीत आहे, त्यामुळे तापल्या तव्यावर भाजपा पोळी भाजणार, असेच राजकीय निरीक्षकांना सध्या वाटत आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# तुकोबारायांचे माळीनगरमध्ये उभे रिंगण!

## वारकऱ्यांना आता सावळ्या विठुरायाच्या दर्शनाची आस

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बोला पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय'च्या जयघोषाने खडूस येथील माउलींचे गोल रिंगण पार पडले. तर दुसरीकडे तुकोबारायांच्या पालखीचे माळीनगर येथे उभे रिंगण रंगले. हे रिंगण सोहळे झाल्यावर माउलींची पालखी वेळापूर तर तुकोबारायांची बोरगाव येथे मुक्कामी पोहोचली.**





गुरुवारी माउलींच्या पालखीचे ठाकुरबुवा समाधी येथे गोल रिंगण तसेच सोपानदेव यांची बंधुभेट होऊन पालखी भंडीशेगाव येथे मुक्कामी असणार आहे. तर संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचा पंढरपूर तालुक्यात प्रवेश होत असून पिराची कुरोली येथे मुक्काम राहणार आहे. आता भाविकांना सावळ्या विठुरायाच्या दर्शनाची आस लागली आहे. माळशिरस येथे काल मुक्कामी असलेल्या माउलींच्या पालखीने बुधवारी सकाळी मार्गक्रमण केले. काही वेळातच खुडूस फाटा येथे हा सोहळा पोहोचला. येथील मैदानावर माउलींच्या पालखीचे दुसरे रिंगण रंगले. भव्य मैदानावर भाविकांची अगोदरपासूनच मोठी गर्दी जमा झाली होती. हातात भगवी पताका, टाळ-मृदंगाचा, हरिनामाचा जयघोष आणि रिंगण सोहळा पाहण्याची उत्सुकता भाविकांना लागली होती. रिंगणाच्या ठिकाणी माउलींची पालखी विराजमान झाली. त्यानंतर माउलींचे अश्व आले. चोपदाराने इशारा करताच उपस्थित भाविकांनी बोला पुंडलिक वरदेचा जयघोष केला. टाळ-मृदंग आणि माउली माउलीच्या जयजयकाराने आसमंत दुमदुमून गेले आणि अश्वाने गोल फेरी पूर्ण केली. रिंगण झाल्यावर विविध खेळ, फुगडीचा आनंद भाविकांनी घेतला. यानंतर पालखी सोहळा वेळापूर येथे विसावला. तर दुसरीकडे जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या पालखीने अकलूज येथून प्रस्थान ठेवले आणि पालखी माळीनगर येथे पोहोचली. या ठिकाणी उभे रिंगण पार पडले. तुकोबारायांच्या पालखीचा नगारखाना त्यानंतर पालखी आणि पाठोपाठ अश्व आले. दुतर्फा भाविकांनी रांगा लावल्या होत्या. विठ्ठल विठ्ठलच्या जयघोषात अश्वाने उभी दौड पूर्ण करून पालखीला नमस्कार करून रिंगण सोहळा संपन्न झाला. यानंतर विविध खेळ खेळून भाविकांनी मनमुराद आनंद घेतला. यानंतर पालखी बोरगाव येथे मुक्कमी पोहोचली. आता संतांच्या पालख्या पंढरी नगरीच्या समीप आल्या आहेत. त्यामुळे भाविकांना सावळ्या विठुरायाच्या दर्शनाची आस लागली आहे. गुरुवारी माउलींच्या पालखीचे ठाकुरबुवा समाधी येथे गोल रिंगण तसेच सोपानदेव यांची बंधुभेट होऊन पालखी भंडीशेगाव येथे मुक्कामी असणार आहे. तर संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचा पंढरपूर तालुक्यात प्रवेश होत असून पिराची कुरोली येथे मुक्काम राहणार आहे. आता भाविकांना सावळ्या विठुरायाच्या दर्शनाची आस लागली आहे. माळशिरस येथे काल मुक्कामी असलेल्या माउलींच्या पालखीने बुधवारी सकाळी मार्गक्रमण केले. काही वेळातच खुडूस फाटा येथे हा सोहळा पोहोचला.

### पालखी सोहळा वेळापूर येथे विसावला

येथील मैदानावर माउलींच्या पालखीचे दुसरे रिंगण रंगले. भव्य मैदानावर भाविकांची अगोदरपासूनच मोठी गर्दी जमा झाली होती. हातात भगवी पताका, टाळ-मृदंगाचा, हरिनामाचा जयघोष आणि रिंगण सोहळा पाहण्याची उत्सुकता भाविकांना लागली होती. रिंगणाच्या ठिकाणी माउलींची पालखी विराजमान झाली. त्यानंतर माउलींचे अश्व आले. चोपदाराने इशारा करताच उपस्थित भाविकांनी बोला पुंडलिक वरदेचा जयघोष केला. टाळ-मृदंग आणि माउली माउलीच्या जयजयकाराने आसमंत दुमदुमून गेले आणि अश्वाने गोल फेरी पूर्ण केली. रिंगण झाल्यावर विविध खेळ, फुगडीचा आनंद भाविकांनी घेतला. यानंतर पालखी सोहळा वेळापूर येथे विसावला. तर दुसरीकडे जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या पालखीने अकलूज येथून प्रस्थान ठेवले आणि पालखी माळीनगर येथे पोहोचली. या ठिकाणी उभे रिंगण पार पडले.

# शक्तिपीठ आंदोलन प्रकरणी ४०० जणांवर गुन्हे!

## शक्तिपीठ महामार्गाविरोधात राज्यातील शेतकऱ्यांनी छेडले आंदोलन

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शक्तिपीठ महामार्ग विरोधात आंदोलन केल्याप्रकरणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टींसह ४०० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर, शक्तिपीठ रद्द करण्यासाठी उद्या, बुधवारी पांडुरंगास साकडे घालण्यात येणार असल्याचे राजू शेट्टी यांनी जाहीर केले आहे.**



शक्तिपीठ महामार्गाविरोधात राज्यातील बारा जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांनी आंदोलन छेडले होते. चक्का जाम आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आंदोलकांना नोटीस बजावण्यात आली होती.बंदीचे आदेश असतानाही जमाव एकत्र करून महामार्ग रोखल्याप्रकरणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी, माजी आमदार ऋतुराज पाटील, राजू आवळे, शिवसेनेचे नेते विजय देवणे यांच्यासह ४०० जणांवर कोल्हापूरच्या शिरोली एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ६ जुलै रोजी पंढरपूर येथे पांडुरंगाची सपत्नीक शासकीय पूजा करणार आहेत. या पूजेच्या आधी मुख्यमंत्र्यांना राज्यातील शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करून संपूर्ण कर्जमुक्ती, राज्यातील जनतेवर व शेतकऱ्यांवर अन्यायकारी शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याची सुबुध्दी द्यावी, याकरिता ४ जुलै रोजी पंढरपूर येथे जाऊन पांडुरंगास साकडे घालणार असल्याचे राजू शेट्टी यांनी सांगितले. शक्तिपीठ महामार्गाविरोधात राज्यातील बारा जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांनी आंदोलन छेडले होते. चक्का जाम आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आंदोलकांना नोटीस बजावण्यात आली होती.बंदीचे आदेश असतानाही जमाव एकत्र करून महामार्ग रोखल्याप्रकरणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी,यांच्यासह ४०० जणांवर शिरोली एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### 400 जणांवर गुन्हे दाखल

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ६ जुलै रोजी पंढरपूर येथे पांडुरंगाची सपत्नीक शासकीय पूजा करणार आहेत. या पूजेच्या आधी मुख्यमंत्र्यांना राज्यातील शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करून संपूर्ण कर्जमुक्ती, राज्यातील जनतेवर व शेतकऱ्यांवर अन्यायकारी शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याची सुबुध्दी द्यावी, याकरिता ४ जुलै रोजी पंढरपूर येथे जाऊन पांडुरंगास साकडे घालणार असल्याचे राजू शेट्टी यांनी सांगितले.शक्तिपीठ महामार्गाविरोधात राज्यातील बारा जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांनी आंदोलन छेडले होते. चक्का जाम आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आंदोलकांना नोटीस बजावण्यात आली होती.बंदीचे आदेश असतानाही जमाव एकत्र करून महामार्ग रोखल्याप्रकरणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी, देवणे यांच्यासह ४०० जणांवर कोल्हापूरच्या शिरोली एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# राहुल गांधी यांच्याविरोधात ईडीचा आरोप!

## पैसे गुपचूप हस्तांतरित करण्यासाठी फसवे व्यवहार केले

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**अंमलबजावणी संचालनालयाने बुधवारी दिल्लीतील एका न्यायालयात सांगितले की, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी नॅशनल हेराल्ड वृत्तपत्राचे प्रकाशक असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडच्या २ हजार कोटींच्या मालमत्तेची मालकी केवळ ५० लाख रुपये देऊन मिळवली आहे.**



